Size : 16cm x 50cm - Option 1

# महती हायड्रो पॉवर वीर प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : ३२/३३, शंकरशेठ रोड, घोरपडे पेठ, स्वारगेट, पुणे - ४११०३७, महाराष्ट्र | www.mahati.com

## सार्वजनिक सूचना

**प्रकरण क्रमांक ६३/२०२१**

विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६२(१)(ए) आणि ८६(१)(इ) मधील आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेचा दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१९ च्या विनियम ९.१, १०.२, ७४ आणि ७७ अन्वये महती हायड्रो पॉवर वीर प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड (MHPVPPL) कडून नूतनीकरण व आधुनिकीकरण अंतर्गत वीर हायड्रो इलेक्ट्रिक प्रोजेक्ट (२ x ४.५ मेगावॅट) साठी प्रकल्पनिहाय वीज दर निश्चितीसाठी करण्यात आलेल्या याचिके वरील सूचना / आक्षेप मागवण्यात येत आहेत.

१. महती हायड्रो पॉवर वीर प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड (MHPVPPL) ने विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६२(१)(ए) आणि ८६(१)(इ) मधील आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेचा दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१९ च्या विनियम ९.१, १०.२, ७४ आणि ७७ अन्वये नूतनीकरण व आधुनिकीकरण अंतर्गत वीर धरण, जि. सातारा येथे असलेल्या वीर हायड्रो इलेक्ट्रिक प्रकल्प (२ x ४.५.) मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पासाठी प्रकल्पनिहाय वीज दर निश्चित करण्यासाठी याचिका दाखल केली आहे.

२. आयोगाने २८ मे २०२१ रोजी याचिका दाखल करून घेतली आहे आणि MHPVPPL ला विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६४(२) नुसार जाहीर सूचना प्रसिद्ध करण्याचे निर्देश दिले आहेत व जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यात आल्या आहेत.

३. MHPVPPL ने आयोगापुढे पुढील विनवण्या केल्या आहेत.

१) शिरवळ, जि. सातारा जवळील वीर धरणावर असलेल्या ९ मेगावॅट क्षमतेच्या वीर जलविद्युत प्रकल्पाचे नूतनीकरण व आधुनिकीकरण अंतर्गत प्रकल्पनिहाय वीज दर मंजूर करून घेण्यासाठी याचिका दाखल करून घेण्यात यावी.

२) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग नूतनशील दर अधिनियम २०१९ मधील अधिनियम ७४ - शिथिलतेचे अधिकार व अधिनियम ७७ - अंतर्गत अडचणी दुर करण्याचे अधिकार वापरून, याचिकेत नमूद केल्याप्रमाणे अधिनियमातील विचलनास मंजुरी मिळावी.

३) वीर हायड्रो ऊर्जा प्रकल्पासाठी रुपये ३.९१ प्रति युनिट याप्रमाणे प्रकल्प आधारित वीज दर मंजूर करणे.

४) जमीन भाडेपट्ट्याचे भाडे, पाणी रॉयल्टी शुल्क तसेच एकूण वीज उत्पन्नाच्या १३% शुल्क जे महाराष्ट्र शासनाला प्रत्यक्ष दरानुसार जमा करायचे आहे ते वसूल करण्यास परवानगी देणे.

५) भविष्यातील आवश्यकतेनुसार याचिकेमध्ये वाढ/फेरबदल/फेरफार /बदल करण्यास परवानगी देणे.

६) माननीय आयोगास योग्य वाटेल त्यानुसार इतर सवलती, सूचना किंवा निर्देश देणे.

७) कोणतीही चूक माफ करणे आणि ती सुधारण्याची संधी देणे.

४. याचिकेची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

तक्ता १ : वीर धरण जि. सातारा येथे प्रस्तावित (२ x ४.५) मेगावॅट लघु जलविद्युत प्रकल्पासाठी भांडवली मूल्य विभागणी (रुपये लाखामध्ये)

| अ.क्र. | प्रकल्प खर्च | रक्कम* |
|---|---|---|
| १. | पाणचक्की व सहाय्यकारी उपकरणे | ७१५.९१ |
| २. | जनित्र व सहाय्यकारी उपकरणे | ६५२.२५ |
| ३. | रोहित्र | १६८.१५ |
| ४. | सहाय्यकारी उपकरणे | १३८.३६ |
| ५. | नियंत्रण, उपकरणे व ऑटोमेशन, १३२ केव्ही स्विचयार्ड मीटरिंग इ. | ६०१.९९ |
| ६. | ऑनलाईन मॉनिटरिंग सिस्टम | ९४.४० |
| ७. | सिव्हिल कामे | १८७.४३ |
| ८. | हायड्रो मेकेनिकल घटक | १२३.९० |
| ९. | निराकरण, उभारणी, चाचणी करणे आणि चालू करणे | १८९.६८ |
| १०. | अंमलबजावणी पूर्व खर्च | ३२५.९१ |
| ११. | आर्थिक खर्च आय.डी.सी.सह | १०२.४६ |
| १२. | लीज कराराच्या कलम ४.१ मधील आर्टिकल १ च्या ड परिच्छेदानुसार जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांना देय थ्रेशोल्ड प्रीमियम (विद्यमान पायाभूत सुविधांची अवशिष्ट किंमत) | ११६८.२० |
| १३. | **एकूण** | **४,४६८.६३** |

टीप : अंदाजे भांडवली खर्च थ्रेशोल्ड प्रीमियम वगळून रुपये ३३००.४३ लाख आहे. *(वरील सर्व रकमांमध्ये जीएसटी व इतर कर आणि शुल्क समाविष्ट आहेत)

तक्ता २ : मापदंड गृहीतके

| क्र. | गृहित हेड | सब-हेड | सब-हेड (२) | युनिट | गृहितके |
|---|---|---|---|---|---|
| १ | **उर्जा निर्मिती** | क्षमता | स्थापित वीज निर्मिती क्षमता | मेगावॅट | ९ |
| | | | क्षमता वापर घटक | % | २६% |
| | | | सहाय्यक वापर | % | १% |
| | | | उपयुक्त जीवन | वर्षे | २५ |
| २ | **प्रकल्प किंमत** | भांडवलाची किंमत/मेगावॅट | ऊर्जा प्रकल्पाची प्रती मेगावॅट किंमत | रु. लाख/मेगावॅट | ४९६.५१ |
| ३ | **आर्थिक गृहितके** | कर्ज: इक्विटी | दर कालावधी | वर्षे | २५ |
| | | | कर्ज | % | ७०% |
| | | | इक्विटी | % | ३०% |
| | | | एकूण कर्ज रक्कम | रु. लाखात | ३,१२८ |
| | | | एकूण इक्विटी रक्कम | रु. लाखात | १,३४१ |
| | | कर्जाची रक्कम | कर्जाची रक्कम | रु. लाखात | ३,१२८ |
| | | | कर्ज परतफेड कालावधी (मॉरेटोरियमसह) | वर्षे | १२ |
| | | | व्याज दर | % | ९.०७% |
| | | इक्विटी रक्कम | इक्विटी रक्कम | रु. लाखात | १,३४१ |
| | | | इक्विटी परतावा | % दर साल | १४% |
| | | | कॉर्पोरेट टॅक्स दर | % दर साल | २५.१७% |
| | | | आरओई कालावधी | वर्ष | २५ |
| | | | आरओईची भारीत सरासरी | % दर साल | १८.७१% |
| | | | रिटर्न ऑन इक्विटी (ग्रॉस अप) | रु. लाखात | २५०.८० |
| | | | सूट दर | % | ८.९५% |
| | | घसारा | पहिल्या १२ वर्षांसाठी घसारा दर | % | ५.८३% |
| | | | १३ व्या वर्षानंतर घसारा दर | % | २.३१% |
| ४. | **ऑपरेशन, देखभाल व दुरुस्ती** | पॉवर प्लांट - प्राथमिक वर्ष | | रु. लाख/मेगावॅट | १२५.१२ |
| | | एस्केलेशन फॅक्टर | | % | ३.२८% |
| ५. | **खेळते भांडवल** | निश्चित शुल्कासाठी | | | |
| | | ऑपरेशन आणि देखभाल | | महिने | १ |
| | | दुरुस्ती सामग्री | (ऑपरेशन आणि देखभालीची टक्केवारी) | % | १५% |
| | | देणेकऱ्याकडून देय रकमेचा कालावधी | | महिने | २ |
| | | खेळत्या भांडवलावरील व्याज | | % | ८.५७% |

तक्ता ३ : निर्धारित दर घटक

| **वर्ष** | **युनिट** | **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** | **१०** | **११** | **१२** | **१३** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| निव्वळ ऊर्जा विक्री | दशलक्ष युनिट | २०.२५ | २०.२५ | २०.२५ | २०.२५ | २०.२५ | २०.२५ | २०.२५ | २०.२५ | २०.२५ | २०.२५ | २०.२५ | २०.२५ | २०.२५ |
| **खर्च** | | | | | | | | | | | | | | |
| ऑपरेशन आणि देखभाल | रु. लाख | १२५ | १२९ | १३३ | १३८ | १४२ | १४७ | १५२ | १५७ | १६२ | १६७ | १७३ | १७८ | १८४ |
| घसारा | रु. लाख | २६१ | २६१ | २६१ | २६१ | २६१ | २६१ | २६१ | २६१ | २६१ | २६१ | २६१ | २६१ | १०३ |
| मुदतीच्या कर्जावरील व्याज | रु. लाख | २८० | २५८ | २३५ | २११ | १८८ | १६४ | १४० | ११७ | ९३ | ६९ | ४६ | २२ | ९ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | रु. लाख | १४ | १४ | १४ | १४ | १४ | १४ | १४ | १४ | १५ | १५ | १५ | १५ | १५ |
| इक्विटीवरील परतावा | रु. लाख | २५१ | २५१ | २५१ | २५१ | २५१ | २५१ | २५१ | २५१ | २५१ | २५१ | २५१ | २५१ | २५१ |
| इनटेक देखभाल शुल्क | रु. लाख | १० | १० | ११ | ११ | १२ | १२ | १२ | १३ | १३ | १४ | १४ | १४ | १५ |
| **एकूण किंमत** | रु. लाख | **९४०** | **९२४** | **९०५** | **८८६** | **८६७** | **८४९** | **८३०** | **८१२** | **७९४** | **७७६** | **७५९** | **७४१** | **५७७** |
| **निव्वळ दर** | रुपये/युनिट | **४.६४** | **४.५६** | **४.४७** | **४.३६** | **४.२८** | **४.१९** | **४.१०** | **४.००** | **३.९२** | **३.८३** | **३.७५** | **३.६५** | **२.८५** |

| **वर्ष** | **युनिट** | **१४** | **१५** | **१६** | **१७** | **१८** | **१९** | **२०** | **२१** | **२२** | **२३** | **२४** | **२५** | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| निव्वळ ऊर्जा विक्री | दशलक्ष युनिट | २०.२५ | २०.२५ | २०.२५ | २०.२५ | २०.२५ | २०.२५ | २०.२५ | २०.२५ | २०.२५ | २०.२५ | २०.२५ | २०.२५ | |
| **खर्च** | | | | | | | | | | | | | | |
| ऑपरेशन आणि देखभाल | रु. लाख | १९० | १९७ | २०३ | २१० | २१७ | २२४ | २३१ | २३९ | २४६ | २५४ | २६३ | २७१ | |
| घसारा | रु. लाख | १०३ | १०३ | १०३ | १०३ | १०३ | १०३ | १०३ | १०३ | १०३ | १०३ | १०३ | १०३ | |
| मुदतीच्या कर्जावरील व्याज | रु. लाख | ९ | ९ | ९ | ९ | ९ | ९ | ९ | ९ | ९ | ९ | ९ | ९ | |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | रु. लाख | १५ | १५ | १५ | १५ | १६ | १६ | १६ | १६ | १६ | १६ | १७ | १७ | |
| इक्विटीवरील परतावा | रु. लाख | २५१ | २५१ | २५१ | २५१ | २५१ | २५१ | २५१ | २५१ | २५१ | २५१ | २५१ | २५१ | |
| इनटेक देखभाल शुल्क | रु. लाख | १५ | १६ | १६ | १७ | १८ | १८ | १९ | १९ | २० | २१ | २१ | २२ | |
| **एकूण किंमत** | रु. लाख | **५८३** | **५९०** | **५९७** | **६०५** | **६१२** | **६२०** | **६२८** | **६३६** | **६४५** | **६५४** | **६६३** | **६७३** | |
| **निव्वळ दर** | रुपये/युनिट | **२.८८** | **२.९१** | **२.९४** | **२.९९** | **३.०२** | **३.०६** | **३.०९** | **३.१४** | **३.१९** | **३.२३** | **३.२७** | **३.३२** | |

तक्ता ४ : समतुल्य दर

| | |
|---|---|
| स्तरीय दर २५ वर्षांसाठी (रुपये प्रति युनिट) | रुपये ३.९१ |

५. या सूचनेद्वारे आयोगाने MHPVPPLला आपल्या याचिकेवर लोकांकडून सूचना / हरकती मागवण्याचे निर्देश दिले आहेत. प्रकाशित केलेल्या सार्वजनिक सूचनेवर, प्रत्येक व्यक्ती ज्याला सूचना / आक्षेप नोंदवायचे असतील ते इंग्रजी किंवा मराठी भाषेत इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे / ईमेलद्वारे सादर करू शकतातः ehearing@merc.gov.in / secretary@merc.gov.in किंवा लिखित स्वरूपात टपालद्वारे **मा. सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३वा मजला, केंद्र क्रमांक १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०000५ या अधिकृत पत्त्यावर २४ जून २०२१ रोजी सायंकाळी ५.00 वाजता** किंवा त्यापूर्वी पाठवावे. सोबत सेवेचा पुरावा जोडावा आणि श्री. सुजय शहा, संचालक, MHPVPPL यांच्या ई-मेलः regulatory.hydro@mahati.com वर पाठवावा. निर्दिष्ट तारखेनंतर प्राप्त झालेल्या सूचना आणि/किंवा हरकतींचा विचार केला जाणार नाही. MHPVPPL ला दिनांक **२५ जून २०२१** पर्यंत प्राप्त झालेल्या प्रत्येक आक्षेप/टिपण्णीस ते प्राप्त झाल्याच्या तीन दिवसाच्या आत म्हणजेच **२८ जून २०२१** पर्यंतच उत्तर देता येईल. MHPVPPLने भागधारकांना दिलेल्या जबाबांवर भागधारक प्रत्यक्ष सुनावणीच्या वेळी किंवा जास्तीत जास्त दिनांक **२ जुलै २०२१** पर्यंत पुनःआक्षेप अर्ज दाखल करू शकतात.

६. वरील परिच्छेद ५ नुसार आपल्या टिप्पण्या / सूचना दाखल केलेल्या प्रेषक / हरकतदाराला ऑनलाईन सुनावणीच्या वेळी व्यक्तिशः आपली बाजू मांडावयाची असल्यास त्यांनी सूचना / आक्षेप नोंदवतानाच त्यासंबंधी स्पष्ट उल्लेख केला पाहिजे. सोबत वैध ईमेल आयडी आणि मोबाइल नंबर देणे अनिवार्य असेल. आयोग स्वतःच्या मर्जीनुसार अशा प्रेषक / हरकतदाराला ई-सार्वजनिक सुनावणीमध्ये ऐकण्याची परवानगी द्यायची किंवा द्यायची नाही याचा निर्णय घेऊ शकतो. ई-सुनावणीला उपस्थित असलेले सर्व सहभागी **१७ सप्टेंबर २०२०** रोजी अधिसूचित व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सार्वजनिक सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांच्या तरतुदींचे पालन करतील.

७. विस्तृत याचिका दस्तऐवज आणि कार्यवाहीचा सारांश MHPVPPLच्या www.mahati.com वेबसाइटवर उपलब्ध आहेत आणि कार्यवाहीचा सारांश आयोगाच्या वेबसाइट www.merc.gov.in वर डाउनलोड करण्यायोग्य स्वरूपात (विनामूल्य) उपलब्ध आहे.

८. **२९ जून २०२१ रोजी सकाळी १०:३० वाजता** व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सुनावणी होईल, ज्यामध्ये MHPVPPL च्या दर निश्चितीकरणाच्या अर्जावर विचार केला जाईल. यासाठी स्वतंत्र नोटीस बजावली जाणार नाही.

सही/-

ठिकाण : मुंबई
दिनांक : ४ जून २०२१

**सुजय शहा**
संचालक
**महती हायड्रो पॉवर वीर प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड**

*सदर जाहिरात ही MERC ने दिनांक २९ मे २०२१ रोजी मान्यता दिलेल्या इंग्रजी जाहिरातीचा अनुवाद असून कायदेशीरदृष्ट्या फक्त इंग्रजीत प्रसिद्ध झालेली जाहिरात ग्राह्य धरली जाईल.